| | | | |
|---|---|---|---|
| MHAU090028482018 | प्राप्त तारीख | : | ३०.१०.२०१८ |
| | नोंदणी तारीख | : | ३०.१०.२०१८ |
| | निकाल तारीख | : | ०५.०५.२०२६ |
| | **कालावधी** | : | **०७वर्ष ०६महिने ०६दिवस** |

**Form No.XXXII**

**(Title Page of Judgment)**

**[Para 44 (i) of Chapter VI of Criminal Manual]**

**पैठण येथील ३रे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**

**पीठासीन अधिकारी आर.के.बाफना/भळगट**

**(न्यायनिर्णयाचा दिनांकः ०५/०५/२०२६)**

**नि. फौ. खटला क्रमांक ५०२/२०१८** **निशाणी क्र.३३**

| |
|---|
| **गुन्हा नोंद क्र. १८२/२०१८ भा. दं. वि. कलम ३७९ प्रमाणे पोलीस ठाणे पाचोड, ता. पैठण, जि. औरंगाबाद.** |

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी/अभियोग पक्ष | : | महाराष्ट्र शासन,<br>मार्फतः पोलीस ठाणे पाचोड<br>पैठण, जि. औरंगाबाद |
| सहायक सरकारी अभियोक्ता | : | श्री. ए.एस.बडजाते. |
| आरोपी | : | संभाजी रावसाहेब गोल्डे<br>वय – ३५ वर्षे, व्यवसायः चालक<br>रा. लेभेंवाडी, ता. अंबड, जि.जालना. |
| आरोपीचे वकील | : | श्री.आर.के.पल्लोड. |

**भाग–ब**

**[Para 44 (ii) of Chapter VI of Criminal Manual]**

----------------------------------------

| | | |
|---|---|---|
| गुन्हयाची तारीख | : | २६.०६.२०१८ |
| गुन्हा नोंदणीची तारीख | : | २६.०६.२०१८ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप पत्र दाखल केल्याची तारीख | : | २३.०८.२०१८ |
| दोषारोपाची तारीख | : | १९.०८.२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | : | ०४.१०.२०२२ |
| न्यायनिर्णय प्रलंबीत ठेवल्याची तारीख | : | ०५.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय घोषीत केल्याची तारीख | : | ०५.०५.२०२६ |

**आरोपीचा तपशील**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हयाची कलमे | निर्दोष मुक्त/शिक्षेस पात्र |
|---|---|---|---|---|---|
| १. | संभाजी रावसाहेब गोल्डे | ३०.०६. २०१८ | ३०.०६ .२०१८ | भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे प्रमाणे | निर्दोष मुक्त. |

**भाग-क**

**[Para 44 (iii) of Chapter VI of Criminal Manual]**

**अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालय यांचे साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोगपक्षः**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र.१ | नवनाथ भाऊसाहेब कोल्हे (नि.०७) | साक्षीदार |
| सा.क्र.२ | प्रताप दगडु सुंदरडे (नि.०८) | जप्ती पंच |
| सा.क्र.३ | भगतसिंग गणपत दुल्हत (नि.२०) | फिर्यादी |
| सा.क्र.४ | गोरखनाथ वामन कणसे (नि.२७) | तपासी अंमलदार |

**ब) बचावपक्षाचे साक्षीदारः**

| |
|---|
| **निरंक** |

**क) न्यायालयाचे साक्षीदारः**

| |
|---|
| **निरंक** |

**अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालय यांचे निशाणीची यादी**

**अ) अभियोगपक्षः**

| अ.क्र. | निशाणी क्र. | तपशिल |
|---|---|---|
| १. | जप्ती पंचनामा | २१ |
| २. | फिर्याद | २२ |
| ३. | अटक पंचनामा | २९ |

**ब) बचावपक्षः**

| |
|---|
| **निरंक** |

**क) न्यायालयाचे निशाणीः**

| |
|---|
| **निरंक** |

**ड) मुद्देमाल वस्तूः–**

| **अ.क्र.** | | **तपशिल** |
|---|---|---|
| १. | एम आर क्र. ७६/२०१८ | एक सोनालिका कंपनीचा डी आय ७४५ निळया रंगांचा ट्रॅक्टर पासिंग क्र. एम एच २० ए वाय ९५१० जुना वा ट्रॉलीसह व वर नमुद ट्रॅक्टरचे विना पासिंग ट्रॉलीमध्ये अंदाजे एक ब्रास वाळु |

## न्यायनिर्णय

## (दिनांक ०५ मे २०२६ रोजी पारीत)

**०१.** प्रस्तुत संपरीक्षा आरोपीविरुध्द भा.दं.वि. कलम ३७९ अन्वये शिक्षेस पात्र अपराधसाठी घेण्यात आली.

**अभियोग पक्षाची हकीगत थोडक्यात खालील प्रमाणेः**

**०२.** दि.२६.०६.२०१८ रोजी १७.३० वा सुमारास औरंगाबाद कडून बिड जाणारे राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ रोडवर आरोपीने त्याच्या त्याब्यातील सोनालीका कंपनीचे ट्रॅक्टर क्र एम एच २० ए वाय ९५१० यास जोडलेल्या विना क्रमाकांचे ट्रॉलीमध्ये विनापरवाना बेकायदेशिररित्या शासनाची गौण खनिज वाळु अंदाजे १ ब्रास

किंमत रु.५०००/– अशी स्वतःच्या फायदयासाठी विना रॉयल्टी अवैद्य रित्या वाळूची चोरी केली. त्यानंतर फिर्यादीने आरोपीविरुध्द पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली म्हणुन आरोपीं विरुध्द कलम भा.दं.वि. कलम ३७९ अन्वये गु.र.क्र.१८२/२०१८ नोंदविण्यात आला.

**०३.** तपासअधिकारी गोरखनाथ वामण कणसे यांनी गुन्ह्याचा तपास केला. तपासात त्यांनी घटनास्थळ, जप्ती पंचनामा केला व अटकेचा पंचानामा व साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले, तपासाअंती दोषारोप पत्र दाखल केले.

**०४.** आरोपीविरुध्द दोषारोप निश्चित केले. आरोपीजा दोषारोप वाचून व समजावून सांगीतले असता आरोपीने गुन्हा कबूल केला नाही. त्यामुळे संपरिक्षा घेण्यात आली. त्यानंतर फिर्यादीचा पुरावा बंद करण्यात आला.

**०५.** आरोपीविरुध्द गुन्हा दर्शक पुरावा आल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१) (ब) अन्वये जबाब नि.क्र. ३२ वर नोंदविण्यात आला.

**०६.** दोन्ही पक्षातर्फे युक्तिवाद ऐकला. पुराव्याचे अवलोकन केले. त्यावरुन खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यांचे निष्कर्ष कारणांसह खालील प्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि.२६.०६.२०१८ रोजी १७.३० वा सुमारास औरंगाबाद कडून बिड जाणारे राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ रोडवर आरोपीने त्याच्या त्याब्यातील सोनालीका कंपनीचे ट्रॅक्टर क्र एम एच २० ए वाय ९५१० यास जोडलेल्या विना क्रमाकांचे ट्रॉलीमध्ये विनापरवाना बेकायदेशिररित्या शासनाची गौण खनिज वाळु अंदाजे १ ब्रास किंमत रु.५०००/– अशी स्वतःचया फायदयासाठी विना रॉयल्टी अवैद्य रित्या वाळूची चोरी केली व त्याव्दारे आरोपीने भा.दं.वि. कलम ३७९ अन्वये अपराध | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | केला, हे अभियोग पक्ष शाबीत करतो का ? | |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणे

**मुद्दा क्र.१ करीता –**

**०७.** अभियोग पक्षास असे सिध्द करणे आवश्यक आहे की, दि.२६.०६.२०१८ रोजी १७.३० वा सुमारास औरंगाबाद कडून बिड जाणारे राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ रोडवर आरोपीने त्याच्या त्याब्यातील सोनालीका कंपनीचे ट्रॅक्टर क्र एम एच २० ए वाय ९५१० यास जोडलेल्या विना क्रमाकांचे ट्रॉलीमध्ये विनापरवाना बेकायदेशिररित्या शासनाची गौण खनिज वाळु अंदाजे १ ब्रास किंमत रु.५०००/– अशी स्वतःच्या फायदयासाठी विना रॉयल्टी अवैद्य रित्या वाळूची चोरी केली.

**०८.** प्रस्तुत प्रकरणात सरकारी वकील व आरोपीचे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता प्रस्तुत प्रकरणात सा. क्र.१ नवनाथ भाऊसाहेब कोल्हे, सा.क्र.२ भगत गणपत दुलत यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि.२६.०८.२०१८ रोजी त्यांना आडगाव जावळे येथे एक ट्रॅक्टर आढळून आला. त्यावेळेस पोका राख आडगाव जावळे येथे भेटले. ट्रॅक्टरमध्ये वाळू असल्याचे शंका आल्याने दुलत यांनी ट्रॅक्टर थांबवण्याचा इशारा केला. ट्रॅक्टर चालक ट्रॅक्टर पुढे घेतो असे म्हणून ट्रॅक्टर सोडून पळून गेला. ट्रॅक्टर मध्ये त्यांना वाळू मिळून आली. वाळूची रॉयल्टी व वाहनाची कागदपत्रे मिळून आली नाही. ट्रॅक्टर सोनालिका कंपनीचा त्याचा क्रमांक एम एच२० ए वाय ९५१० व विना क्रमांकाची ट्रॉली होती. दुलत यांनी दोन पंचांना बोलावून ट्रॅक्टर, ट्रॉली व वाळूचा पंचनामा केला. त्यानंतर ट्रॅक्टर पोलिस स्टेशनला आणले. दुलत यांनी ट्रॅक्टर चालक व मालक यांच्याविरुध्द तक्रार दाखल केली. ट्रॅक्टरचे चालक व मालक संभाजी गोल्डे असल्याचे त्यांना समजले. ट्रॅक्टरमध्ये वाळू विना रॉयल्टीची असल्यामुळे गुन्हा दाखल केला. ते आरोपीला

ओळखतात. सा.क्र.३ याने नि.क्र. २१ वर जप्ती पंचनामा केला व फिर्याद नि.क्र. २२ वर दिली.

०९. सा क्र. १ च्या उलटतपासात असे आले आहे की, पोका गांगवे घटनेच्या दिवशी सरकारी वाहन चालवत होते. घटनास्थळावर भरपूर वाहतूक असते. ज्यावेळेस त्यांची गाडी तथाकथीत ट्रक्टरच्या समांतर येत नाही तोपर्यंत ट्रॅक्टर चालकाला इशारा देता येऊ शकत नाही. त्यांची गाडी आरोपीच्या गाडीला समांतर आल्यानंतर दुलत यांनी गाडीची काच खाली करुन ट्रॅक्टरच्या चालकाला इशारा केला. ट्रॅक्टरचे स्पीड जास्तीत जासत ३० ते ४० कि मी पर्यंत असते व त्यांच्या गाडीची स्पीड १६० कि मी पर्यंत जाऊ शकते. त्यांनी इशारा दिल्यानंतर ट्रॅक्टर चालकाला इशारा केला असता त्याने तो ट्रॅक्टर ४० ते ५० फुट अंतरावर उभा केला. त्यांनी त्यांची गाडी ट्रॅक्टरच्या पुढे नेली नाही. ट्रॅक्टर चालक ज्याठिकाणी ट्रॅक्टर सोडून गेला त्या ठिकाणचा घटनास्थळ पंचनामा त्यांनी केला नाही. आडगांव जावळे रस्त्यावर साधारण १०० गट नंबर आहे. पोका राख त्यांच्या कामासाठी मोटार सायकलवर निघाले होते. राख यांना कोठून कोठे चालले याबाबत त्यांनी विचारणा केली नाही. ते औरंगाबाद कडे चाल्ले होते की बिड कडे चाले होते हे तो सांगू शकत नाही. त्याने जबाब देतांना ट्रॅक्टर चालकाला ओळखता यावे यासाठी त्याचा रंग कोणता, शरिरयष्टी याबाबत कोणतेही वर्णन दिलेले नाही. ट्रॅक्टर मधील वाळू कोठून चोरु झाली याबाबत त्याला काहीही माहीती नाही.

१०. सा.क्र. २ च्या उलटतपासात असे आले आहे की, पोका राख आडगाव जावळे या ठिकाणी भेटले याबाबतचा मजकूर फिर्यादीत का नमूद केला नाही याचे कारण तो सांगू शकत नाही. तो पोहेका राख आडगाव जावळेच्या कोणत्या गटाजवळ भेटले हे तो सांगू शकत नाही. ते गाडीतून खाली उभे राहिले त्या ठिकाणी हॉटेल होते व लोकांची ये जा होती. त्यांनी ट्रॅक्टरकडे व त्यांच्यापासून पुढे गेल्यानंतर पाहिले. आरोपी कोणाच्या शेतात पळून गेला हे तो सांगू शकत नाही. पंचनामा कोणत्या गटाजवळ केला याबाबत पंचनाम्यामध्ये नमूद केलेले नाही. फिर्यादीमध्ये चालकाचे वर्णन नमूद केलेले नाही.

**११.** सा.क्र. २ प्रताप दगडु सुंदरडे हा फितुर झाल्याने त्याने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे घटनास्थळ व जप्ती पंचनामा शाबीत झालेला नाही.

**१२.** साक्षीदार क्र.४ गोरखनाथ वामन कणसे यांच्या पुराव्यात असे आले की, दि.२६.०६.२०१८ रोजी गुर क्र.१८२/२०१८ चा तपास त्याच्या कडे आला. ट्रॅक्टर व ट्रॉली याची मुददेमाल पावती त्याने नि.क्र. २८ वर फाडली. फिर्यादीचा पुरवणी जबाब व साक्षीदारांचे तपास टिपण नोंदवले. आरोपीला अटक करुन आरोपीच्या अटकेचा पंचनामा नि.क्र. २९ वर केला. ट्रॅक्टर व ट्रॉलीचे कागदपत्र हसतगत केले. तहसीलला व आर टी ओला वाहनाचा परवाना रदद करण्याबाबत नि.क्र. ३० व ३१ वर पत्र दिले. आरोपीविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

**१३.** सदर साक्षीदाराच्या उलटतपासात असे आले आहे की, घटनास्थळ औरंगाबाद बीड रस्त्यावर कोठे आहे हे त्याला सांगता येत नाही. त्याला त्याच्या चतुःसिमा ही सांगता येत नाही. फिर्यादीमध्ये कोल्हे गाडी चालवत होता असे सांगितले आहे. कोल्हेचा त्याने जबाब घेतलेला आहे.तपासामध्ये ट्रॅक्टर औरंगाबाद की बीड चाले होते हे त्याला सांगता येत नाही. घटनास्थळ त्याला माहिती नसल्याने त्याने घटनास्थळाला भेट दिली नाही. कोल्हेचा जबाब घेतांना घटनास्थळ कोठे आहे, त्याच्या चतुःसिमा याबाबत त्याने विचारपूस केली नाही. पूर्ण तपासात ट्रॉली कोणत्या रंगाची, दोन चाकी की चार चाकी होती याचे वर्णन आलेले नाही. वाळूचे वजन किती होते, वाळू त्यामध्ये होती, वाळू एक ब्रास होती असे त्याच्या तपासात निष्पन्न झालेले नाही. फिर्यादीमध्ये चालकाचे वर्णन केलेले नाही. केवळ ट्रॅक्टर रजिस्टर मालक संभाजी गोल्डे असल्याने त्याने त्याचे नाव टाकले. वाळू कोठून आणली होती, वाळू कोठे चाली होती याचा उल्लेख त्याच्या तपासात नाही. वाळू कोणत्या नदीतून आणली होती हे त्याचया तपासात निष्पन्न झाले नाही.

**१४.** अभिलेखावर आलेल्या पुराव्यात सा.क्र. २ प्रताप दगडु सुंदरडे हा फितुर झाल्याने त्याने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे घटनास्थळ व जप्ती पंचनामा

शाबीत झालेला नाही. सा. क्र.४ यांच्या पुराव्यात तपासामध्ये ट्रॅक्टर औरंगाबाद की बीड चाले होते हे त्याला सांगता येत नाही, घटनास्थळ त्याला माहिती नसल्याने त्याने घटनास्थळाला भेट दिली नाही, कोल्हेचा जबाब घेतांना घटनास्थळ कोठे आहे, त्याच्या चतुःसिमा याबाबत त्याने विचारपूस केली नाही, पूर्ण तपासात ट्रॉली कोणत्या रंगाची, दोन चाकी की चार चाकी होती याचे वर्णन आलेले नाही, वाळूचे वजन किती होते, वाळू त्यामध्ये होती, वाळू एक ब्रास होती असे त्याच्या तपासात निष्पन्न झालेले नाही, फिर्यादीमध्ये चालकाचे वर्णन केलेले नाही, केवळ ट्रॅक्टर रजिस्टर मालक संभाजी गोल्डे असल्याने त्याने त्याचे नाव टाकले, वाळू कोठून आणली होती, वाळू कोठे चाली होती याचा उल्लेख त्याच्या तपासात नाही, वाळू कोणत्या नदीतून आणली होती हे त्याचया तपासात निष्पन्न झाले नाही असे आले आहे. सा.क्र.१ व २ यांच्या पुराव्यात बऱ्याच विसंगती आहे. त्यामुळे त्यांचा पुरावा अभियोग पक्षास उपयुक्त नाही. त्यामुळे दि.२६.०६.२०१८ रोजी १७.३० वा सुमारास औरंगाबाद कडून बिड जाणारे राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ रोडवर आरोपीने त्याच्या त्याब्यातील सोनालीका कंपनीचे ट्रॅक्टर क्र एम एच २० ए वाय ९५१० यास जोडलेल्या विना क्रमाकांचे ट्रॉलीमध्ये विनापरवाना बेकायदेशिररित्या शासनाची गौण खनिज वाळु अंदाजे १ ब्रास किंमत रु.५०००/– अशी स्वतःच्या फायदयासाठी विना रॉयल्टी अवैद्य रित्या वाळूची चोरी केली हे सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपींविरुध्द कोणताही गुन्हा दर्शक पुरावा आलेला नाही. त्यामुळे अभिलेखावर आलेल्या पूराव्यावरुन आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब त्यामुळे हे न्यायालय मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**१५.** **<u>मुद्दा क्र.२ करीता –</u>** उपरोक्त निष्कर्षावरुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी संभाजी रावसाहेब गोल्डे यांची भा.द.वि. कलम ३७९ अन्वये या गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपींचे वैयक्तीक जातमुचलके व जामीन बंधपत्रे रद्द करण्यात येतात. |
| ३. | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७ (अ) अन्वये रक्कम रुपये १५,०००/- चा वैयक्तीक जातमुचलका व जामीन बंधपत्र द्यावे. |
| ४. | सदर गुन्ह्यातील एम आर क्र. ७६/२०१८ जप्त मुद्देमाल एक सोनालिका कंपनीचा डी आय ७४५ निळया रंगांचा ट्रॅक्टर पासिंग क्र. एम एच २० ए वाय ९५१० जुना वा ट्रॉलीसह हे अपील कालावधीनंतर त्यांच्या मुळ मालकास देण्यात यावे. |
| ५. | अपील कालावधीनंतर जप्त वाळु बाबत तहसिलदार यांनी योग्य ती कारवाई करावी. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.) |

RASHMI KALPESH BAPHANA
Digitally signed by RASHMI KALPESH BAPHANA
Date: 2026.05.05 16:56:26 +0530

ठिकाण -पैठण
दिनांकः ०५.०५.२०२६

(आर. के. बाफना/भळगट)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (कोर्ट क्र.३),
पैठण

**<u>प्रमाणपत्र</u>**

........... मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ्. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | आर.एस. पुरी (लघुलेखक नि.श्रे.) |
| न्यायालयाचे नाव | : | ३रे न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, पैठण |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | ०५.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०५.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | ०५.०५.२०२६ |